# सेंटर पॉईट स्कूलने जिंकले टीसीएम विझ २०१६



*प्रतिनिधी / २८ सप्टेंबर*

**नागपूर :** देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्यूशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे भारतातील सर्वात मोठी आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धा डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह सिव्हिल लाईन्स येथे आयोजित करण्यात आले. यात सेंटर पॉईट स्कूलने जिंकले टीसीएम विझ २०१६ नागपूरचे फेरीचे विजेते पद जिंकले. विजेत्या टिमला टीसीएस इंटर्नल आयटी अँड शेअर सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष व जागतिक प्रमुख आलोककुमार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या टीसीएस आयटी विझच्या नागपूर प्रदेशिक फेरीत विविध शाळांच्या एकूण ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. इयत्ता ८ ते १२ वीपर्यंत विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा निःशुल्क होती. यात लेखी प्राथमिक फेरीद्वारे अंतिम फेरीसाठी सहा टीम निवडण्यात आल्या असून भारतभरात पंधरा ठिकाणी ही स्पर्धा घेण्यात आली. या प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्न मंजुषेच्या पाच फेऱ्यानंतर सेंटर पॉईट स्कूल (काटोल रोड), शाळेच्या मोहम्मद तहा उद्दीन व देवेश राजपूत या विद्यार्थ्यांनी स्पर्धा जिंकली. तसेच अंतिम फेरीतील विजेत्यांना प्रत्येकी एक आयपॅड देऊन तर उपविजेते ठरलेल्या शिवाजी सायन्स ज्युनिअर कॉलेजच्या कुणाल वासनिक व ऋत्विक गुप्ते यांना मिनी आयपॅड तसेच स्मृतिचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंमित फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएफतर्फे स्पेस पॅक, सेल्फी स्टिक, इअरफोन्स, ब्लुटूथ स्पिकर्स व पेन ड्राइव्ह असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक व पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येणार आहे. संचालन गिरी पिकब्रेन सुब्रमण्यम यांनी केले.